# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६/७/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१०) इतिवृत्त**

**बुधवार, दिनांक १६ जुलै २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ४-५० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(प्र.), नगर सचिव यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. वसंत नरवडे पाटील
५. सौ. अल्पा विकास जैन
६. श्री. जावेद हसन खान
७. श्री. संजय जोशी
८. श्रीमती जयश्री किवळेकर
९. श्री. रविकांत गवळी
१०. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
११. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१२. श्री. सिताराम सुरे
१३. श्री. नारायण कुचे

**<u>संवाद :</u>**

श्री.सतिष कटकटे : जाफरगेट नाला लगत जागेत भोलेश्वर मार्केट येथील लोकांना पर्यायी जागा दिली होती. येथील खुल्या जागेत नगर रचना विभागाने बांधकाम परवानगी दिली याबाबत खुलासा करावा.

श्री.रविकांत गवळी : सुपारी हनुमान मारोती जवळ रोड वाईडिंग मधे भोलेश्वर ट्रस्टची जागा होती. सदरील जागा ताब्यात घेवून तथिल १५ लोकांना पर्यायी जागा जाफरगेटच्या शाळेच्या मागील बाजूस नियमानुसार १९८८ ला ताबा पावतीने पर्यायी जागा दिली होती. मा.आयुक्तांनी वॉर्ड अधिकाऱ्यांसोबत जावून जागेची पहाणी केली व सदरील जागा महानगरपालिकेच्या ताब्याची म्हणून त्या ठिकाणी बोर्ड लावण्यात आला व तिन दिवसांनतर बोर्ड काढण्यात आला. सन १९९८ला ताबा पावतीच्या आधारे तिथे् अधिकार दिला त्याच जागेवर दुस-या व्यक्तीला परवानगी कशी देतो. याचा प्रशासनाने खुलासा द्यावा.

मा.सभापती : मालमत्ता विभागाकडे माहिती असल्यास त्यांनी खुलासा सादर करावा. नगर रचना विभागाचे अधिकारी अनुपस्थित आहेत. याचा खुलासा उपआयुक्त (प्र) यांनी करावा.

उपआयुक्त (प्र) : मागच्या बैठकीत जे अधिकारी गैरहजर होते त्यांना ताकीद देवून ते आजच्या बैठकीस हजर आहे. परंतु आजच्या बैठकीत टाउन प्लॅनिंगचे अधिकारी का उपस्थित नाही याबद्दल प्रशासनाकडे कुठलीच माहिती सध्या नाही.

श्री.वसंत नरवडे : आजच्या बैठकीस जे अधिकारी गैरहजर आहेत त्यांना समज देण्यात यावी.

मा.सभापती : उपआयुक्त (महसूल) यांनी लेखी कळविले की, त्यांची मतदानाची डयुटी असल्याकारणाने हजर राहू शकत नाही. तसेच इतर अधिकारी गैरहजर आहे त्यांच्या विरूध्द काय कारवाई करता येईल ते सदस्यांनी सांगावे.

श्री.वसंत नरवडे : लोक बांधकाम करणार. जेसीबी लावून काढावे. अधिकाऱ्यांना आत्मीयता नसेल तर, पगार रोका, निलंबन करा.

श्री.सतिष कटकटे : लाखो करोडो रूपयांची जमीनी असून भोलेश्वर मार्केटचे जे १५ लोकांना महानगरपालिकेची जागा म्हणून दिली. तिन दिवसांपूर्वी तिथे बुलडोजर चालवले गेले. महानगरपालिकेचा बोर्ड काढुन टाकण्यात आला.

दत्ताभाउ पाथ्रीकर : मालमत्ता अधिकारी यांना बोलावून त्यांच्याकडुन खुलासा सादर करावा.

मालमत्ता अधिकारी : या बाबतची माहिती आता माझेकडे उपलब्ध नाही.

श्री.संजय जोशी : मा.सतिष कटकटे यांनी ताबा पावती आणलेली आहे. ती १९९८ ला ताबा पावती झालेली आहे. त्यात स्पष्ट उल्लेख आहे त्यांचे कच्चे घर बाधीत होत असतांना स्थायी समिती ठराव क्र.३१९/२९,दि.१४/११/९७ अन्वये १० बाय १५ खुली जागा मोहल्ला बहादुरपुरा येथिल मनपा शाळेच्या भिंतीलगत जागा देण्याचा ठराव मंजूर झालेला आहे. या बदल्यात महानगरपालिकेने ति जागा ताब्यात घेतलेली आहे.

श्री.वसंत नरवडे : सदरील जागेचे पी.आर.कार्ड झालेले आहे का?

श्री.संजय जोशी : सर्वात प्रथम जे बांधकाम सुरू आहे ते थांबविण्यात यावे. ताबा पावती असतांना बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तिथे महानगरपालिकेचा बोर्ड तात्काळ लावण्यात यावा. सी.टी.एस. १३४६१ परवाना क्र.८०९/२००६-२००७ फाईल क्र.८३८/१७/२००६-०७, दि.२३/०३/२००७. एवढी माहिती दिल्यावर पुन्हा काय आवश्यक आहे?

मा.सभापती : बांधकाम परवानगी स्थगीत करता येईल.

मालमत्ता अधिकारी : बांधकाम परवानगी दर्गा हजरत ख्वाजा मोइनउल्ला शहा तर्फे सज्जादा नशिन गुलाम शहा साहब भाडेकरू स. इफ्तेखार पिता अलिमउद्दीन व इतर सहा, मोतिकारंजा असे नमुद केलेले आहे.

श्री.संजय जोशी : ताबा पावती घेतांना शंकर बाला जखवाडे यांची जमीन होती. व परवानगी देतांना भाडेकरू म्हणून दिली.

श्री.रविकांत गवळी : बांधकाम परवागी देतांना पी आर कार्ड चेक करतो काय? सन २००६-०७ ला बांधकाम परवानगी दिली त्यावेळेस पी आर कार्डवर कुणाची नोंद आहे ते तपासले काय? मालकी गरजेचे आहे का, का आपण तशीच परवानगी देतो याबाबत नोंदी बघीतले का?

श्री.संजय जोशी : प्रत्यक्ष ताबा पावती मा.सभापती यांनी बघावी व जागेवर काय परिस्थिती आहे ते संबधित अधिका-यांना बोलावून विचारणा करण्यात यावी. व ताबा पावती नुसार जागा कुठली व परवानगीची जागा कुठली याची शहानिशा करावी.

श्री. रशिद मामू : मागच्या बठकीत एक रूलिंग देवून अधिका-यानी उपस्थित रहाणे बाबत सूचना दिली होती. तरी सुध्दा टाउन प्लॅनिंगचे अधिकारी गैरहजर आहेत. तरी पुढील बैठकीत सभागृहा तर्फे पत्र देवून मा.आयुक्तांना हजर रहाणे बाबत कळवावे.

मा.सभापती :सदर प्रकरणाची मुळ संचिका मागविण्यात येत आहे.मुळ संचिका आल्या नंतर चर्चा करून कारवाई करण्यात येईल. वारंवार सुचना देवूनही टाउन प्लॅनिंगचे अधिकारी श्री. विष्णू वझे व श्री.पी.जी.पवार गैरहजर आहेत. याचा प्रशासनाने त्यांच्याकडुन खुलासा करून घ्यावा. श्री.रशिद मामु यांच्या सुचनेनुसार स्थायी समितीच्या सदस्यांच्या वतीने मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पुढील बैठकीत हजर राहावे.

श्री.संजय जोशी :मार्कींग केलेली आहे पण सीटीएस नंबर टाकलेला नाही. मालमत्ता विभागाकडून सदरची फाईल मागविण्यात यावी. ९७-९८ ची फाईल आहे. मालमत्ता विभागाने ताबा पावती केली.

मा.सभापती : सदरची फाईल मागविण्यात आली आहे.

श्री.संजय जोशी : ताबा पावती मालमत्ता विभागाचे अनुरेखक श्री.एस.एस.गायकवाड यांनी केली आहे.

मा.सभापती : परवानगी ही लॅप्स झालेली आहे. दि.२३.०३.२००७ला परवानगी देण्यात आलेली आहे. याची मुदत २२.०३.२००८ ला संपलेली आहे.

श्री.संजय जोशी : परवानगी दिली कुणी.

श्री.सतिष कटकटे : अनुरेखक श्री.एस.एस.गायकवाड सध्या कुठल्या विभागात कार्यरत आहे.

मा.सभापती : प्रशासनाने याचा खुलासा सादर करावा.

श्री.अ.रशिद मामू : हर्सुल तलावामधील माती चोरीला जात आहे. एका गाडीचे ५० रूपये प्रमाणे दिवसातुन १०० ते १२५ ट्रक्टर जातील. मालमत्ता विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. सीस्टेमॅटीक द्यावे, शिस्त लावावी. नुकसान होत आहे.

श्री.रविकांत गवळी :हर्सुल तलावातील गाळ काढणे हि प्रशासनाची जबाबदारी आहे. पाणी नसल्यामुळे गाळ काढणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमण्यात यावे जेणे करून मातीची चोरी होणार नाही.

मा.सभापती : हर्सुल तलाव येथे २४ तास सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा.

श्री.अ.रशिद मामू : मागच्या सभेत चांगल्या कामामुळे प्रशंसा केली. पदमपूरा येथिल गॅरेजचे अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. तेथे टपऱ्या होत आहे, खुलासा घ्यावा.

मा.सभापती : सदरील प्रकरणाचा अहवाल उपआयुक्त (म) यांच्याकडून मागविला होता तो ०७ तारखेस प्राप्त झाला आहे.

श्री.अ.रशिद मामू :अतिक्रमण बाबतची माहिती प्रेसला डायरेक्ट अधिकाऱ्यांकडून दिली जाते हयामुळे जनतेत वेगळी भावना निर्माण होत आहे. खाजगी लोक खुणा करतात. त्यामुळे संभ्रम निर्माण होत आहे.

मा.सभापती : वृत्तपत्राला डायरेक्ट अधिका-यांकडून माहिती दिली जाते या बद्दल काय कारवाई करता येईल. मा.आयुक्तांनी पत्र काढले होते, डायरेक्ट प्रेसला देवू नये.

उपआयुक्त (प्र) : सर्व अधिका-यांना सुचना देण्यात आल्या आहेत की, कार्यालयीन माहिती देण्यात येवू नये जी काही माहिती असेल ती मा.आयुक्त किंवा मा.महापौरच देतील.

मा.सभापती : या बाबतचे परिपत्रक नगर सचिव हे वाचून दाखवतील.

नगर सचिव : परिपत्रक वाचून दाखवतात.

मा.सभापती : उपआयुक्त (सिडको) यांनी खुलासा सादर करावा.

उपआयुक्त (सिडको) : मा.आयुक्तांच्या सूचनेनुसार ज्या भागातील अतिक्रमण काढणार आहे तेथिल जनतेच्या मालमत्तेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी वृत्तपत्रातून माहिती देण्यात आली. मा.आयुक्तांसह चर्चा झाली होती. मा.आयुक्तांना कल्पना दिली होती. नागरीकांना दोन दिवसापुर्वी माहीत असावे म्हणून दिले.

मा.सभापती :उपआयुक्त (म) यांनी दि. ७/७/२००८रोजी पदमपूरा येथिल कारवाई बाबत अहवाल दिलेला आहे. अहवाल नगर सचिव वाचवून दाखवतील.

नगर सचिव : अहवाल वाचून दाखवितात.

श्री.रविकांत गवळी : २४ मिटर रस्त्यातील अतिक्रमणे काढण्याची कारवाई प्रशासकीय विभागा मार्फत झालेली आहे.

मा.सभापती : २४ मिटर रस्त्यावरच कारवाई झाली आहे का की त्याव्यतिरीक्त अजून कुठले अतिक्रमण पाडण्याचे बाकी आहे. तसेच दिवाकर गॅरेजचे बांधकाम का पाडण्यात आले नाही. दोन सभांपासून सूचना देत आहोत.

उपआयुक्त (सिडको) :आरक्षण क्र ३१८ प्रशासकीय इमारती करीता आरक्षीत असून सदर जागेचा ताबा कागदोपत्री २००५ ला महानगरपालिकेला मिळाला असून याबाबात मा.आयुक्तांना रेकॉर्ड दाखवून सदर अतिक्रमण काढलेले आहे. सदरची जागा अतिक्रमणरहीत केलेली आहे. मा.सभापती यांनी दिवेकर गॅरेज येथील अतिक्रमण पाडण्यासंदर्भात सांगीतले होते त्यानुसार ति जागा जगजीवनराम सोसायटीची असून त्यांना १९८४ ला परवानगी दिली आहे. त्यामुळे मनपाला कारवाई करता आली नाही.

श्री.सतिष कटकटे : २४ मिटर रस्त्यावर दिवाकर गॅरेजच्या आजुबाजूचे जे अतिक्रमण काढले ते कसे कुठल्या आधारे काढण्यात आले. २४ मी. मध्ये दिवेकर ॲटो गॅरेज येते का? दिवेकर गॅरेज पुढे आहे. बाकीचे मागे आहे.

श्री.अ.रशिद मामू : क्रांतिचौकातील मोठी इमारत पाडण्यात आली बांधकाम परवानगी होती. ती कशाच्या आधारे पाडण्यात आली.

उपआयुक्त (सिडको) : टाउन प्लॅनिंगने २४ मिटर रस्त्यावर मार्कींग करून देण्यात आली आहे. त्यानुसार अतिक्रमण काढण्यात आले आहे. दिवेकर गॅरेजचे पुढचे अतिक्रमण काढण्यात आलेले आहे. मागील बाजुची मार्कींग नसल्याकारणाने अतिक्रमण काढण्यात आले नाही.

श्री.अ.रशिद मामू : उपआयूक्त (सिडको) यांनी चौकशी करणे गरजेचे होते की, मागील बाजूस मार्कींग का करण्यात आले नाही.

श्री.सतिष कटकटे : उपआयूक्त (सिडको) यांनी सांगीतले की, मार्कींग केलेली नसल्यामुळे अतिक्रमण काढण्यात आले नाही. पण आज जे गॅरेज पाडले आहे तिथे पुन्हा दुकाने येवून बसलेल्या आहेत.

मा.सभापती : आरक्षण असलेल्या जागेबाबत श्री.शेट्टे यांनी चुकीची माहिती स्थायी समितीकडे दिलेली आहे.

श्री.वसंत नरवडे : ५ एकर एलो बेल्टवर कारवाई केलेली आहे. आरक्षणावर कारवाई केलेली नाही.

मा.सभापती : उपआयुक्त (म) यांच्या अहवालानुसार प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना प्रशासनाने अतिक्रमण काढण्यास घाई का करण्यात आली आहे.

श्री.रविकांत गवळी :२४ मिटर रस्त्यावरील अतिक्रमण काढतांना काही अतिक्रमण चुकून काढण्यात आली आहे अशी चर्चा सभागृहात झाली. परंतु वस्तुस्थिती बधता जे अतिक्रमण काढले आहे ति प्रॉपर्टी महानगरपालिकेच्याच ताब्यातील आहे. प्रकरण न्यायालयीन असल्याने सर्व पैसा न्यायालयात जमा केलेला आहे. उर्वरित पैसे समाजकल्याण तर्फे येणार आहे जे अजून आलेले नाही. जे अतिक्रमण काढलेले आहे त्यात प्रशासनाची चुक म्हणता येणार नाही. २४ मिटर रस्त्यावर अतिक्रमण काढत असतांना जगजिवनराम मागासवर्गीय सोसायटी च्या वर गॅरेज आहे. सदरील गॅरेज २४ मिटर रस्त्यात येत होते. ते काढणे गरजेचे होते.

श्री.अ.रशिद मामु : खाजगी एलो बेल्ट वरील अतिक्रमण काढण्यात आलेले आहे.

मा.सभापती : मा.डिव्हीजनल कमिशनरने त्यांच्या ३.५ एकर जागेवरील अतिक्रमण काढणेबाबत पत्र दिले होते काय याचा खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे : टयुरिस्ट ॲमीनीटी सेंटर करीता जागा आरक्षणा संदर्भात मा.विभागीय आयुक्तांचा अभिप्राय मागविला आहे. प्रकरणांचा अद्याप पावेतो निर्णय झालेला नसतांना मा.विभागीय आयुक्तांचा अभिप्राय येणे बाकी असतांना व प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना अतिक्रमण का काढण्यात आले.

उपआयुक्त (सिडको) : एक जागा आरक्षण क्र. ३१८ मनपा प्रशासकीय करीता राखीव आहे. व ३१९ हि जागा टयुरिस्ट ॲमीनीटी सेंटर करीता जागा राखीव असल्याकारणाने तेथिल अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. एलो बेल्ट,ग्रीन बेल्ट व इतर प्रकारची कुठलीच माहिती टाउन प्लॅनिंगकडून मिळालेली नाही.

मा.सभापती : दिवेकर गॅरेज पासून १४० फुट कार्यवाही झाली. महानगरपालिकेचा पैसा वाया गेला. २४ मिटर रस्त्यावर मार्कींग होती आतिल मार्कींग केलेली नसतांना अतिक्रमण काढण्यात आले. आरक्षीत जागा ५ एकर असून टयुरिस्ट ॲमीनीटी सेंटर ३ एकर असून एलो बेल्ट ५.५० एकर आहे. व हया ५.५० एकरवर काय कारवाई करण्यात आलेली आहे खुलासा करावा.

उपआयुक्त (सिडको) : मनपाच्या जागेवर व आरक्षणात कार्यवाही केली आहे.

मा.सभापती : मनपाची ५ एकर जागे व्यतिरीक्त ९ एकरवर कारवाई करण्यात आली. सदर जागेचा ताबा महानगरपालिकेस मिळालेला नाही. उपआयुक्त (म) यांनी आपल्या अहवालात स्पष्ट सांगीतले आहे की, सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.व ताबा महानगरपालिकेस

मिळालेला नाही. न्यायालयीन अंतिम निकालानंतर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येईल.

उपआयुक्त (सिडको) : मा.आयुक्तांनी एसएलओ यांना समक्ष बोलावले होते. त्यानंतर अतिक्रमण काढण्यात आले.

मा. सभापती : आरक्षणातील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया असते का. उदा.३६५ आरक्षण घेणार का.

श्री. संजय जोशी : मा.सभापती हे स्थायी समितीचे सदस्य होते तेव्हापासून मागणी लावून धरली होती.

श्री.रविकांत गवळी : अहवाल स्थायी समितीस प्राप्त झाला असून सदरील अहवालावर काय निर्णय घेता येईल.

मा. सभापती : श्री.वाहूळ व खालचे कर्मचाऱ्यांनी मीसगाईड केले असेल.

श्री.वसंत नरवडे : सदरील जो अहवाल आला आहे त्यावर निर्णय घ्यावयाचा आहे तर याबद्दल मा.आयुक्तांना परिपुर्ण माहिती दिली जाते का, टाउन प्लॅनिंग कडून अहवाल मागविण्यात यावा. स्थानिक चुकीची माहिती देत असतील.

मा.सभापती : पदमपूरा अतिक्रमण प्रकरणी स्थायी समितीने उपआयुक्त (म) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी नेमली होती. त्यांचा अहवाल दि.७.७.२००८ रोजी प्राप्त झाला होता आणि त्याच दिवशी स.सदस्यांना प्रति वाटण्यात आल्या होत्या. अहवालात नमूद पदमपुरा येथिल जागा प्रत्यक्ष महानगरपालिकेच्या ताब्यात नव्हती प्रकरण न्यायप्रविष्ठ होते. उपआयुक्त (सिडको) हे नविण असले तरी प्रशासकीय अधिकारी श्री.वाहूळ हे त्यांच्या सोबत होते. तिन वेळा लक्ष वेधून सुध्दा दिवेकर गॅरेजचे अतिक्रमण काढण्यात आले नाही. त्यामुळे श्री.बिपीन वाहुळ, प्रशासकीय अधिकारी यांच्या विरूध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश देण्यात येत आहे उपआयुक्त (म) हे चौकशी करतील. व सदरील अहवालात उपआयुक्त (सिडको) यांनी जेवढी दखल घ्यावयास हवे तेवढी घेतलेली नाही. महानगरपालिकेचे लाखो रूपयांचे खर्च करून अतिक्रमण काढण्यात आले पण त्यावर पुन्हा अतिक्रमण झालेले आहे त्यामुळे उपआयुक्त (सिडको) यांच्यावर काय कारवाई करावी ते मा.आयुक्तांनी ठरवावे.

श्री.वसंत नरवडे : अतिक्रमण काढतांना रस्ता निश्चित किती फुटाचा आहे याची माहिती जनतेला व्हायला हवी. पैठणगेट बाबत नेमकी काय प्रक्रीया.

श्री.सतिष कटकटे : पैठणगेट ते सिल्लेखाना भागात मार्कीग होवूनसुध्दा अतिक्रमण का काढले जात नाही. पथकही गेले होते.

उपआयुक्त (सिडको) : मार्कींग बद्दल टाउन प्लॅनिंगचे काय अडचणी आहेत ते श्री.वझे व पवार हे खुलासा करतील.

श्री.वसंत नरवडे : पैठणगेट येथिल रस्ता ११८ फुटावरून १०० फुटावर मार्कीग कशी आणण्यात आली. ११८ फुटावरून १०० फुटावर मार्कींग निश्चित कुठल्या दिशेने केली. बांधकामास परवानगी असतांनासुध्दा मार्कींग करण्यात आली आहे याचा खुलासा करावा.

श्री. सतीश कटकटे : मार्कींग नाही तर वादविवाद कशामुळे. पथक परत आले.

श्री.वसंत नरवडे पा. : परवानगी घेतली. २ दिवसापासून प्रयत्न करतो. १०० फुट मार्कींग काढणार की नाही. दुकाने रिकामे करून ठेवले आहे.

मा. सभापती : जेथे तयार आहेत तेथे कार्यवाही होत नाही.

श्री.वसंत नरवडे पा. : सिल्लेखाना कब्रस्तान तोडले. पैठणगेट येथील का तोडले नाही.

श्री.सतिष कटकटे : पैठणगेट येथिल अतिक्रमण का काढण्यात येत नाही? एका व्यक्तीने कोर्टातुन स्टे आणलेला आहे मोबदला दिल्या शिवाय अतिक्रमण काढता येणार नाही. अशा लोकांना मोबदला देणार आहे काय? प्रशासनाने याबाबतीत कुठल्या उपाययोजना आखलेल्या आहेत.

उपआयुक्त (सिडको) : ११८ फुटाची मार्कींग जेएमएस सर्व्हे प्रमाणे होती. प्रत्यक्ष रस्त्याची रूंदिची मोजणी केल्यावर १०० फुटाची मार्कींग केली. त्यामुळे कुठली मार्कींग ग्राहय धरावयाची याचा निर्णय घ्यावा लागेल. त्यामुळे मा.आयुक्तांकडून निर्णय घेण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : जेएमएस प्रमाणे ११८ फुट प्रमाणे मार्कींग केली ती नंतर १०० फुटावर आणण्यात आली तर हा निर्णय कुणी घेतला.

श्री.सतिष कटकटे : रूंदिकरणामधे जाणूनबुजून अडथळा आणत आहे. वर्तमानपत्रामधे निवेदन देवून अतिक्रमण पथक त्याठिकाणी गेले होते.

उपआयुक्त (सिडको) : अतिक्रमण पथक अतिक्रमण काढण्यास पैठणगेट येथे गेलेले नसून फक्त मार्कींग करीता गेलेले आहे. मार्कींग करतांना वाद झाला.

श्री.वसंत नरवडे : १५ तारखेला अतिक्रमण काढणार असे प्रसिध्दीस दिले होते. परंतु आज पर्यंत अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. लोकांनी व्यवसाय बंद केले. TDR की मोबदला याबाबत थांबले. १०० फुट सांगितले, ११८ फुट करता येणार नाही. पश्चिमेकडून मार्कींग कायम ठेवणार का. बांधकाम पपरवानगी घेवून बांधले आहे.

उपआयुक्त (सिडको) : पैठण गेट येथिल मार्कींग श्री.वझे यांना ३ दिवसात मार्कींग किंवा जो काही निर्णय आहे तो कळविण्यास सांगीतलेला आहे.

श्री.सतिष कटकटे : कटकटगेट,क्रांतिचौक,सिल्लेखाना, पदमपुरा तसेच इतर भागातील अतिक्रमणे तात्काळ काढण्यात आले मग पैठणगेट येथिल अतिक्रमण काढण्यास एवढा उशिर का लागतो.

मा.सभापती : इतर मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले आहे.

श्री.अ.रशिद मामु : जेएमएस कोण करते महानगरपालिका करते का टाउन प्लॅनिंग करते.

उप आयुक्त(सिडको) : सिटी सर्व्हे जेएमएस करते.

श्री.अ.रशिद मामु : आपण ११८ वर मार्कींग का केली? सदरील काम सिटी सर्व्हे यांचे होते.

श्री.वसंत नरवडे : शहागंज गांधी पुतळा ते सराफा चौक मार्कींग महानगरपालिकेने केली इतर कुणी केली.

उपआयुक्त (सिडको) : शहागंज भागातील मार्कींग महानगरपालिकेने मा.आयुक्त यांचे आदेशान्वये केली आहे. टाउन प्लॅनिंगची मार्कींग झाल्यानंतर विधी विभागाचा अभिप्राय घेवून कारवाई करण्यात येते.

मा.सभापती : लॅन्ड ॲक्वेजीशन (भूसंपादन) करण्याची पध्दत कशा स्वरूपाची आहे.

उप अभि.(न.र.) : ज्या रस्त्याचे भुसंपादन करावयाचे आहे. त्याचे जेएमएस करून मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवला जातो मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळाल्यानंतर सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयात पाठविला जातो.आणि नंतर भुसंपादन काढले जाते.

श्री.सतीश कटकटे : आपण सांगा जोपर्यंत जे. एम. एस. होत नाही तोपर्यंत खाली करू नका.

मा.सभापती : पैठणगेट येथिल अतिक्रमण केव्हा काढणार आहे.

उपआयुक्त (सिडको) : मार्कींग पुर्ण झाल्याचे टाउन प्लॅनिंग कडून रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर २ दिवसात कारवाई करण्यात येईल. सोमवारी पैठणगेटची कारवाई करण्यात येईल.

मा.सभापती : सराफा ते सिटी चौक वरील कारवाई केव्हा केली जाणार आहे.

उपआयुक्त (सिडको) : सराफा ते सिटी चौक वरील कारवाई मंगळवारी करण्यात येईल.

सौ.मोमीन सफीया : वॉर्ड नं ९६ मधे अब्रारकॉलनी, हमीद कॉलनी येथिल नागरीक १९८६ पासुन कर अदा करत आहेत. गुंठेवारीत १५ ते २० लाख रूपये भरणा केला आहे. ज्या लोकांनी टॅक्स भरलेला आहे त्यांना मुळ सुविधा देवून ज्या लोकांनाी टॅक्स भरलेला नाही त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : गुंठेवारी व टाउन प्लॅनिंगचे अधिका-यांनी पुढच्या बैठकीत सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.वसंत नरवडे : शहरातील पार्कींगच्या व्यवस्थेबद्दल काही जागा आरक्षीत कराव्या लागतील.पार्कींगशिवाय शहराचा विकास शक्य होणार नाही. टाउन प्लॅनिंगने आणि मा.आयुक्तांनी पार्कींगझोन बाबत योग्य ते पावले उचलावे. जेणे करून पार्कींगची

समस्या सुटण्यास मदत होईल. शहरातील पार्कींगसाठी लागणा-या जागा मनपाने आरक्षीत करून घ्याव्या.

मा.सभापती : पार्कींगच्या बाबतीत वारंवार स.सदस्यांनी मागच्या बैठकीमधे प्रश्न उपस्थित केला होता. टाउन प्लॅनिंग विभागालाही सुचना केलेल्या आहेत परंतु प्रशासन पार्कींगबाबत कुठलेही पावले उचलत नाही. पुढील बैठकीमधे याबाबत खुलासा करावा.

श्री.वसंत नरवडे : महानगरपालिका स्वतःच्या ज्या जागा भाडेपट्ट्यावर देतो. त्यातील काही जागा जसे पैठणगेट येथिल पार्कीगची निवीदा आली नाही तेव्हा तेथील वसूली कोण करते व जे पार्कींग करत होते त्यांना १० टक्के नॅचरल ग्रोथ धरून निवीदा दयायला हवी होती. परंतु तसे करण्यात आले नाही. महानगरपालिकेचे लोक दिसत नाही. तर सध्या वसुली कुणीच करत नाही.

मा.सभापती : मालमत्ता विभागाने याबाबतील पुढील बैठकीमधे माहिती सादर करावी.

मा.सभापती : विषय पत्रीकेला सुरवात करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र. ६३ :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त(सिडको), मनपा औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेचे जाफरगेट व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलाव जा.क्र.मनपा/मामअ/४१७/२००८, दिनांक १८-३-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दिनांक २८-३-२००८ रोजी प्रत्यक्षात जाहीर लिलाव ठेवला असता बोलीत खालील दोन व्यक्तींनी भाग घेतला होता.

दुकान क्र.१० करीता (१) श्री.राहुल विजय पवार रक्कम रू.१५८०/- शेवटची बोली.

(२) श्री.मनोज रामनारायण राठी रक्कम रू.१५८५/- शेवटची बोली.

यामध्ये सर्वात जास्त बोली श्री.मनोज रामनारायण राठी यांनी रक्कम रू.१५८५/- अशी जास्तीची बोली बोललेली आहे जी की, महानगरपालिकेने सदरील दुकानाची आधारभुत भाडे प्रतीमाह रू.५४०/- ग्राह्य धरले होते.

तरी दुकान क्र.१० करीता श्री.मनोज रामनारायण राठी यांनी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवाकर घेणे योग्य व नियमाप्रमाणे दुकानास मालमत्ता कर जो येईल तो नियमाप्रमाणे संबंधीतास भरणा करावा लागेल. सदरील प्रस्ताव मान्य झाल्यास महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार करारनामा करून घेवुन दुकान भाडेपट्ट्यावर देणे योग्य.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे जाफरगेट व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलावानुसार दुकान क्र.१० करीता श्री.मनोज रामनारायण राठी यांनी रक्कम रू.१५८५/-अशी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवाकर आकारून महानगरपालिकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार दुकान भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ६४ :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त(सिडको), मनपा औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे संजयनगर व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर निविदा/लिलाव जा.क्र.मनपा/मामअ/४१७/२००८ दि.१८-३-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दिनांक २८-३-२००८ रोजी प्रत्यक्षात लिलाव ठेवला असता बोलीत खालील व्यक्तींनी भाग घेतलेला आहे ते खालील प्रमाणे.

०१. दुकान क्र.५ साठी एकूण दोन व्यक्तींनी भाग घेतला होता.

**श्री.नामदेव पांडुरंग शिंदे शेवटची बोली रू.१७२०/- प्रती माह**

श्री.देविदास जगन्नाथअण्णा खांडखुळे शेवटची बोली रू.१७१०/- प्रती माह

महानगरपालिकेने सदरील दुकानासाठी आधारभुत भाडे रक्कम रू.४४७/- ग्राह्य धरले होते. त्यानुसार श्री.नामदेव पांडुरंग शिंदे यांनी जास्तीची बोली बोलली आहे.

तरी दुकान क्र.५ साठी रक्कम रू.१७२०/- श्री.नामदेव पांडुरंग शिंदे यांची बोली मान्य करावयाची असल्यास त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवा शुल्क घ्यावे लागेल व नियमाप्रमाणे मालमत्ता कर भरावा लागेल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे संजयनगर व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलावानुसार दुकान क्र.५ साठी श्री.नामदेव पांडुरंग शिंदे यांनी प्रतिमहा रक्कम रू.१७२०/- अशी जास्तीची बोली बोलल्यानुसार त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवा शुल्क घेवून प्रचलित अटी शर्तीनुसार दुकान भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५ :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त(सिडको), मनपा औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया मार्केट व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचा जाहीर लिलाव जा.क्र.मनपा/मामअ/४१७/२००८ दिनांक १८-३-२००८ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवुन दिनांक २८-३-२००८ रोजी प्रत्यक्षात लिलाव ठेवला असता बोलीत खालील व्यक्तींनी भाग घेतला आहे ते खालील प्रमाणे

०१ **दुकान क्र.एस-११** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. द्वारकादास जगन्नाथ मुंदडा** | **शेवटची बोली रू.४६०/- प्रती माह** |
| श्री. अफसर खान अजीज खान | शेवटची बोली रू.४५०/- प्रती माह |

०२. **दुकान क्र.एस-१४** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. शेख कलीमोद्दीन शेख फसीऊद्दीन** | **शेवटची बोली रू.४६०/- प्रती माह** |
| श्री. शेख रफीक शेख गफुर | शेवटची बोली रू.४५५/- प्रती माह |

०३. **दुकान क्र.एस-२०** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. जितेंद्र व्ही. खाडे** | **शेवटची बोली रू.७८०/- प्रती माह** |
| श्री. रविंद्र किसन झोबाडे | शेवटची बोली रू.७७०/- प्रती माह |

०४. **दुकान क्र. बी-९** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. सोहेल अहमद अली अहेमद** | **शेवटची बोली रू.८५०/- प्रती माह** |
| श्री. फजल अहेमद अली अहेमद | शेवटची बोली रू.८४०/- प्रती माह |

०५. **दुकान क्र. बी-१०** साठी एकुण तीन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. फजल अहेमद अली अहेमद** | **शेवटची बोली रू.११५०/- प्रती माह** |
| श्री. सोहेल अहमद अली अहेमद | शेवटची बोली रू.११२५/- प्रती माह |

०६. **दुकान क्र. बी-११** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. राहुल विजय पवार** | **शेवटची बोली रू.२५५०/- प्रती माह** |
| श्री. अफसरखान अजीज खान | शेवटची बोली रू.२५४०/- प्रती माह |
| श्री. हरीषभाई मावजी पटेल | शेवटची बोली रू.१८००/- प्रती माह |

०७. **दुकान क्र. बी-१४** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. फजल अहेमद अली अहेमद** | **शेवटची बोली रू.१११०/- प्रती माह** |
| श्री. सोहेल अहमद अली अहमद | शेवटची बोली रू.११००/- प्रती माह |

०८. **दुकान क्र. बी-२०** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. सोहेल अहमद अली अहेमद** | **शेवटची बोली रू.८००/- प्रती माह** |
| श्री. इलियास अब्दुल गफार | शेवटची बोली रू.७९०/- प्रती माह |

०९. **दुकान क्र. ए-१४** साठी एकुण दोन व्यक्तींनी बोलीत भाग घेतला होता.

| | |
|---|---|
| **श्री. मोहंमद शफी अब्दुल अजीज** | **शेवटची बोली रू.१५६०/- प्रती माह** |
| श्री. मुशीर अहेमद शब्बीर अहेमद | शेवटची बोली रू.१५५०/- प्रती माह |

महानगरपालिकेने दुकान क्र.एस-११ साठी प्रती माह भाडे रू.३४७, एस-१४ साठी प्रतीमाह भाडे रू.४२२, एस-२० साठी प्रती माह भाडे रू.६९१/-, बी-९ साठी प्रती माह भाडे रू.७२७/-, बी-१० साठी प्रती माह भाडे रू.१०२९/-, बी-११ साठी प्रती माह भाडे रू.१००४/-, बी-१४ साठी प्रती माह भाडे रू.१०३२/-, बी-२० साठी प्रती माह भाडे रू.७०३/- असे ग्राह्य धरण्यात आले होते. सदरील दुकानासाठी आधारभुत प्रती माह भाडे रक्कम रू.३४७/-, ए-१४ साठी रू.१३४७/- ग्राह्य धरले होते.

त्यानुसार अनुक्रमे **श्री.द्वारकादास जगन्नाथ मुंदडा** यांनी रू.४६०/- प्रती माह, **श्री.शेख कलीमोद्यीन शेख फसीउद्यीन** यांनी रू.४६०/- प्रती माह, **श्री.जितेंद्र व्ही.खाडे** यांनी रू.७८०/- प्रती माह, **श्री.साहेल अहमद अली अहेमद** यांनी रू.८५०/- प्रती माह, **श्री.फजल अहेमद अली अहेमद** यांनी रू.११५०/- प्रती माह, **श्री.राहुल विजय पवार** यांनी रू.२५५०/- प्रती माह, **श्री.फजल अहेमद अली अहेमद** यांनी रू.१११०/- प्रती माह, **श्री.सोहेल अली अहेमद** यांनी रू.८००/- प्रती माह, **श्री.मोहंमद शफी अब्दुल अजीज** यांनी रू.१५६०/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोललेली आहे.

अ.क्र.१ ते ९ प्रमाणे दर्शविलेल्या संबंधीताची जास्तीची बोली मान्य करावयाची असल्यास त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवा शुल्क घ्यावे लागेल व नियमाप्रमाणे मालमत्ता कर भरावा लागेल.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे सादिया मार्केट व्यापारी संकुलातील रिक्त दुकानांचे जाहीर लिलावानुसार अनुक्रमे **श्री.द्वारकादास जगन्नाथ मुंदडा** यांनी रू.४६०/- प्रती माह, **श्री.शेख कलीमोद्यीन शेख फसीउद्यीन** यांनी रू.४६०/- प्रती माह, **श्री.जितेंद्र व्ही.खाडे** यांनी रू.७८०/- प्रती माह, **श्री.साहेल अहमद अली अहेमद** यांनी रू.८५०/- प्रती माह, **श्री.फजल अहेमद अली अहेमद** यांनी रू.११५०/- प्रती माह, **श्री.राहुल विजय पवार** यांनी रू.२५५०/- प्रती माह, **श्री.फजल अहेमद अली अहेमद** यांनी रू.१११०/- प्रती माह, **श्री.सोहेल अली अहेमद** यांनी रू.८००/- प्रती माह, **श्री.मोहंमद शफी अब्दुल अजीज** यांनी रू.१५६०/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोललेली असल्याने त्यांच्याकडून एक वर्षाचे आगाऊ भाडे, अनामत रक्कम व पाच टक्के सेवा शुल्क आकारून दुकाने भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ६६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्रमांक ८९, ज्योतीनगर भागातील दशमेशनगर व इतर विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१९,४७,२९६/- असून सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यानंतर निविदा मागविल्या असता एकुण सहा निविदा विक्री झाल्या होत्या. त्यापैकी सहाही निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचे निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | अं.प.दरापेक्षा १८% कमी दराने |
| २. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १४.८८% कमी दराने |
| ३. | राणा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १२.८९% कमी दराने |
| ४. | हायवे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ९.०९९% कमी दराने |
| ५. | तुषार कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ७.११% कमी दराने |
| ६. | मुबारक महेबुब पठाण | अं.प.दरापेक्षा ५.२५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८% कमी दराची आहे. सदरील निविदेस मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे. तरी सदरील काम टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचेकडून अं.प.दरापेक्षा १८% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक ८९, ज्योतीनगर भागातील दशमेशनगर व इतर विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांचेकडून सदर काम अं.प.दरापेक्षा १८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्रमांक ८९, ज्योतीनगर भागातील शंभुमहादेवनगर व इतर विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.१७,६७,७००/- असून सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता झाल्यानंतर निविदा मागविल्या असता एकुण सहा निविदा विक्री झाल्या होत्या. त्यापैकी सहाही निविदा प्राप्त झाल्या असून त्यांचे निविदेचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | आर.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा २०.९८% कमी दराने |
| २. | टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश | अं.प.दरापेक्षा १८% कमी दराने |
| ३. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १४.९% कमी दराने |
| ४. | राणा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १३.८६% कमी दराने |
| ५. | हायवे कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ८.९९९% कमी दराने |
| ६. | तुषार कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा ७.१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा आर.के.कन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.९८% कमी दराची आहे. सदरील निविदेस मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करण्यास शिफारस केलेली आहे. तरी सदरील काम आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा २०.९८% कमी दराने करून घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्रमांक ८९, ज्योतीनगर भागातील शंभुमहादेवनगर व इतर विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदर काम अं.प.दरापेक्षा २०.९८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८ :**

उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.१९.३.२००८ रोजी झ ालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात डॉ.बाबासाहेब गणवेश सहाय्य योजने अंतर्गत मनपा शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्याकरीता आवश्यक कार्यवाहीस व त्याकरीता आवश्यक आर्थिक तरतुदीस सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार गणवेश खरेदीकरीता राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. दि.८.४.२००८ ते २२.४.२००८ पर्यंत निविदा विक्री करण्यात आली होती. दि.२५.४.२००८ रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकुण तीन निविदा दरपत्रकांची विक्री झाली व तीन निविदा प्राप्त झाल्या. दि.२५.४.२००८ रोजी निविदाधारकांचे कागदपत्रांचे पहिले पाकीट (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात आले. निविदाधारक पुढील प्रमाणे आहेत. (१) अरविंद मिल्स, (२) मोरारजी मिल्स प्रा.लि., (३) मफतलाल फॅब्रीक्स प्रा.लि. या निविदा धारकांनी निविदेसोबत दिलेले गणवेश कापड मा.आयुक्तांच्या निर्देशानुसार शासनमान्य प्रयोगशाळा, वस्त्र समिती, मुंबई येथे तपासणी करीता पाठविण्यात आले. सदरील संस्थेचा तपासणी अहवाल दि.१९.६.२००८ रोजी प्राप्त झाला. त्या आधारे निविदा धारकांचे निविदा दरांचे पाकीट (देकार लिफाफा) उघडण्यात आले. त्यानुसार मे.मोरारजी मिल्स यांचे दर सहा आयटम करीता तुलनात्मकदृष्ट्या इतरांपेक्षा कमी प्राप्त आहे. तर उव्ररीत सर्व आयटम करीता मे.मफतलाल फॅब्रीक्स यांचे तुलनेने इतरांपेक्षा कमी आहे. त्या अनुषंगाने दि.१५.७.२००८ रोजी मा.आयुक्तांच्या समक्ष मे.मफतलाल फॅब्रीक्स यांचेसोबत दर कमी करण्यासाठी वाटाघाटी केले असता त्यांनी निविदेत दिलेल्या दरापेक्षा ५% कमी दराने साहित्य पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. तसेच मे.मोरारजी मिल्स यांचे सहा आयटम त्यांचेच दरात पुरवठा करण्याची तयारी दर्शविली आहे.

उपरोक्त प्रमाणे दरास मान्यतेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. शिक्षण विभागाने दिलेल्या विद्यार्थी संख्येनुसार गणवेश खरेदीकरीता येणाऱ्या अपेक्षीत खर्चासह मे.मफतलाल फॅब्रीक्स यांची निविदेत दिलेल्या दरापेक्षा ५% कमी दराची निविदा (मोरारजी मिल्स यांचे सहा आयटम त्यांचेच दरात पुरवठा करण्यासह) स्विकृतीस्तव व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजने अंतर्गत सन २००८-०९ या वर्षात मनपा शालेय विद्यार्थ्यांना गणवेश देण्याकरीता प्राप्त निविदानुसार मे.मफतलाल फॅब्रीक्स यांची निविदेत दिलेल्या दरापेक्षा ५% कमी दराची निविदा (मोरारजी मिल्स यांचे सहा आयटम त्यांचेच दरात पुरवठा करण्यासह) स्विकारणेस व त्यानुसार येणाऱ्या खर्चासह गणवेश खरेदीकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९ :**

उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.१९.३.२००८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना रेक्झीन व कॅनवॉस शुज देण्याकरीता आवश्यक कार्यवाहीस व त्याकरीता आवश्यक आर्थिक तरतुदीस सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर साहित्य खरेदी करीता वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करून केवळ उत्पादक कंपन्यांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.८.४.२००८ ते २२.४.२००८ पर्यंत निविदा विक्री करण्यात आली होती व दिनांक २५.४.२००८ रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकूण ०६ निविदा दरपत्रके विक्री झाली व ०४ निविदा दरपत्रके प्राप्त झाली. दिनांक २५.४.२००८ रोजी निविदाधारकांचे कागदपत्रांचे पहिले पाकी (तांत्रिक लिफाफा) उघडण्यात आले. निविदाधारक पुढील प्रमाणे आहेत. (१) लखानी इंडिया लिमिटेड, (२) पी.पी.रबर प्रॉडक्टस्, (३) बाटा इंडिया लिमिटेड, (४) लिबर्टी शुज लिमिटेड.

या निविदाधारकांनी निविदेसोबत दिलेले साहित्याचे नमुने तपासणी करीता शासनमान्य प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. सदर संस्थेचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर निविदा धारकांचे निविदा दरांचे दुसरे पाकीट (देकार लिफाफा) उघडण्यात आले. त्यानुसार रेक्झीन शुज करीता मे.पी.पी.रबर प्रॉडक्टस् यांचे तर कॅनव्हॉस शुज करीता मे.लिबर्टी शुज लि. यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. तथापि मे.लिबर्टी शुज लिमिटेड यांनी निविदा दरपत्रक मुळ स्वरूपात सादर न करता त्याच्या छायांकित प्रतीवर दर नमुद करून सादर केले आहे असे निदर्शनास आले. Maharashtra Manual for Purchase of stores च्या Appendix VIII मधील नियम क्र.१६(१) नुसार निविदा भरतांना मुह प्रतीवरच दर नमुद करून ती परत सादर केली पाहिजे असे नमूद केले आहे. त्यामुळे मे.लिबर्टी शुज लिमिटेड यांची निविदा स्विकृत करण्यात आली नाही. तथापि त्यांनी नमूद केलेले दर कमी असल्याने रेक्झीन शुज करीता ज्या एजन्सीचे दर तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत त्या मे.पी.पी.रबर प्रॉडक्टस् यांना ते लिबर्टी शुज लिमिटेड यांच्या दरात कॅनव्हॉस शुज देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, संबंधीत पुरवठा धारकाने लिबर्टी शुज लिमिटेड यांच्या दरात साहित्य पुरवठा करण्यास संमती दिली आहे. त्यानुसार साहित्य खरेदी करीता प्राप्त दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मान्यतेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

करीता प्रस्ताव स्विकृतीस्तव व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : शुज खरेदी प्रस्तावासंबंधी खुलासा करण्यात यावा. |
| प्र.मुख्य लेखाधिकारी | : प्रतीवर्षी प्रमाणे यावर्षी शालेय विदयार्थासाछर बुट खरेदी करण्यासाठी निवीदा आली होती. त्यात चार निवीदा बाटा, लखानी, पोद्दार, लिबर्टी यांच्या प्राप्त झाल्या होत्या. यापैकी पोद्दार यांची निवीदा कमी किंमतीची असल्याकारणाने त्यांची निवीदा मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. |
| मा.सभापती | : प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना रेक्झीन व कॅनवॉस शुज देण्याकरीता प्राप्त निविदानुसार रेक्झीन व कॅनवॉस शुज हे साहित्य मे.पी.पी.रबर प्रॉडक्टस् यांच्याकडून खरेदी करण्यास तसेच त्यासाठी लागणाऱ्या अपेक्षीत खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगिता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद